**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण**
**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. एनएसपी पोर्टल-२०२२-२३/(४४२२/२२)/शिष्यवृत्ती/ ३१/२६ / ३१२६ दिनांक : २६.०९.२०२३

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व शासकीय/अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कनिष्ठ / वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा.
(सोबत जोडलेल्या यादीमध्ये नमूद महाविद्यालये)

**विषय : - केंद्र पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शिष्यवृत्तीचे वितरण नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर आणि विद्यार्थ्यांच्या / अर्जदारांच्या अर्जांचे पुनश्च प्रमाणीकरण / पडताळणी करण्यावावत सन २०२२-२३ साठी .**

संदर्भ : - १. मा. शिक्षण संचालनालयाचे ईमेलद्वारे प्राप्त पत्र क्र. उशिसं/ पीएमएस८८७६/२०२३ दिनांक ०७.०८.२०२३.
२. प्रस्तुत कार्यालयाचे परिपत्रक क्र. एनएसपी पोर्टल-२०२२-२३/शिष्यवृत्ती/ दिनांक ०९.०८.२०२३.
३. मा. शिक्षण संचालनालयाचे ईमेलद्वारे प्राप्त पत्र क्र. उशिसं/ पीएमएस/२०२३/९६७६ दिनांक ०७.०९.२०२३.
४. प्रस्तुत कार्यालयाचे परिपत्रक क्र. एनएसपी पोर्टल-२०२२-२३/शिष्यवृत्ती/३०२३ दिनांक ११.०९.२०२३.
५. मा. शिक्षण संचालनालयाकडून प्राप्त यादी दिनांक १८.०९.२०२३.
६. मा. शिक्षण संचालनालयाकडून सूचना.
७. मा. शिक्षण संचालनालयाकडून सूचना व यादी दि. २६.०९.२०२३.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात येते की, केंद्रशासन पुरस्कृत अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी शिष्यवृत्तीचे वितरण करणेबाबत महाविद्यालये व विद्यार्थ्यांची आधार आधारीत बायोमॅट्रीक प्रमाणीकरण करण्यासाठी महाविद्यालयाचे HOI (Head of Institute) (Institute Nodal Officer) यांचे Bio metric authentication करण्यासाठी संदर्भिय परिपत्रक क्र. २ आणि ४ अन्वये आपणास ईमेलद्वारे व कार्यालयाच्या संकेतस्थळाद्वारे कळविण्यात आले होते. त्या अनुषंगाने ज्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे बायोमेट्रीक ऑथेन्टिकेशन झाले नाही अथवा ज्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे बायोमेट्रीक ऑथेन्टिकेशन झाले आहे परंतु त्यांचे ऑनलाईन पडताळणी महाविद्यालय स्तरावर झाली नाही. अशा सर्व विद्यार्थ्यांची महाविद्यालयनिहाय यादी सोबत जोडलेल्या मायक्रोसॉफ्ट एक्सेल फॉरमॅटमध्ये देण्यात आली आहे.

उपरोक्त यादीमध्ये महाविद्यालयनिहाय विद्यार्थ्यांचे नाव आहे. सदर मायक्रोसॉफ्ट एक्सेल फॉरमॅटमध्ये अनुक्रमे A, B, C, D असे कॉलम शेवटी रिमार्क नमूद करण्यासाठी आहेत. त्यामध्ये रिमार्क A - Name mismatch with NSP data., B - Aadhar bio-authenticatin fail, C - Death of student/applicant., D - Additional updation issues लिहिताना पुढीलप्रमाणे लिहिण्यात यावे. उदा. A- Name mismatch with NSP data. याचा अर्थ ज्या विद्यार्थ्यांचे आधार मिसमॅच आहेत त्या विद्यार्थ्यांचा रिमार्क A कॉलममध्ये विद्यार्थ्यांच्या नावासमोर A असा रिमार्क लिहून मायक्रोसॉफ्ट एक्सेल फॉरमॅटमध्ये यादी jdpunescholarship@gmail.com या ईमेल आयडीवर तात्काळ पाठवा.

**(डॉ. किरणकुमार बोंदर)**
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे

**प्रत माहिती व कार्यवाहीस्तव,**
**आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व इयत्तांच्या अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना तसेच पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना याबाबत कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना देण्याच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.**

प्रति - १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांना माहितीसाठी सादर.
२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.
७. प्राचार्य, तंत्रनिकेतन व औद्योगिक प्रशिक्षण संस्था.
८. प्राचार्य, वैद्यकिय महाविद्यालये.
९. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, पुणे १.
१०. मा. शिक्षण उपसंचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक संचालनालय, नाशिक.